आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७.००  वाजता

२० नोव्हेंबर २०२३ –सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्यातली ८ लाख हेक्टर शेती सिंचनाखाली आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

- ५४ व्या इफ्फी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला गोव्यात प्रारंभ

- भारत विकसित देश व्हावा, यासाठी ज्यांच्यापर्यंत विकासाचे लाभ पोचले नाहीत, त्यांच्यापर्यंत ते पोचले पाहिजेत, असं केंद्रीय पंचायतराज राज्य मंत्री कपील पाटील यांचं आवाहन

  **आणि**

- आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलन मॉरिशसमध्ये २ आणि ३ डिसेंबरला

**<><><><><>**

राज्यातली 8 लाख हेक्टर शेती सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. भंडारा जिल्ह्यात आयोजित शासन आपल्या दारी या कार्यक्रमात ते बोलत होते. शासन आपल्या दारीचा हा 18 वा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाच्या मध्यमातून 1 कोटी 84 लाख लाभार्थ्यांना लाभ मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड बाईट**

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात धानाला बोनस जाहीर करणार असल्याचं मुख्यंत्र्यांनी सांगितलं. धानाला खोडकिड लागली असेल तर सरकार मदत करेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. राज्यामध्ये कायद्याच्या चौकटीत राहून आरक्षण दिलं जाणार आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी

या कार्यक्रमात सांगितलं. काही जण जाणीवपूर्वक वेगळं वातावरण निर्माण करण्याचं काम करत असल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

54 व्या इफ्फी, अर्थात भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन आज गोव्यात माहिती आणि प्रसारण मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांच्या हस्ते झालं. ठाकूर यांच्या हस्ते फिल्म बाजारचंही उद्‌घाटन झालं. हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा जागतिक चित्रपट बाजार आहे. "कॅचिंग डस्ट" या चित्रपटानं या चित्रपट महोत्वाचा प्रारंभ झाला. मिश्र आशियाई संस्कृतीचा वारसा लाभलेले ब्रिटिश चित्रपट दिग्दर्शक स्टुअर्ट गॅट हे  या पुरस्कार-विजेत्या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. तत्पूर्वी माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री, डॉ एल मुरुगन यांनी चित्रपटातले कलाकार आणि पडद्यामागच्या कलाकारांचा सत्कार केला.

या महोत्सवामध्ये यंदा २७० पेक्षा जास्त चित्रपट दाखवले जाणार आहेत. यामध्ये भारतातील २५ फीचर फिल्म आणि २० बिगर फीचर फिल्म्सचा समावेश आहे. हॉलीवुड अभिनेते आणि निर्माते मायकेल डग्लस यांना यंदाचा सत्यजीत रे जीवनगौरव पुरस्कार देऊनं गौरवण्यात येणार आहे.

<><><><><>

मराठा समाजानं आरक्षणासाठी टोकाची झुंज दिली असल्याचं मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात खराडी भागात झालेल्या जाहीर प्रचार सभेत बोलत होते. मराठा समाज सगळ्यांच्या कल्याणासाठी लढत राहीला असं ते यावेळी म्हणाले..

<><><><><>

नागपुरात आज ‘महा-रेशीम अभियानाचं उद्घाटन झालं. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि रेशीम संचालनालयाचे संचालक गोरक्ष गाडीलकर  यांनी प्रसिद्धी रथास हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.  राज्यात २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत रेशीमशेती विषयी जनजागृती आणि प्रसिद्धी अभियान राबवलं जात आहे. याअंतर्गत इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधित जिल्हा रेशीम कार्यालयात नोंदणी करावी असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**<><><><><><>**

विकसित भारत संकल्प यात्रा आज नांदेड जिल्ह्यात बोधडी आणि थारा इथं पोहोचली. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती घेऊन पोहोचलेल्या संकल्प रथाचं अंगणवाडी बालक, शालेय विद्यार्थी, तसंच गावकऱ्यांनी  मोठ्या उत्साहात स्वागत केलं. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात सरकारी अधिकाऱ्यांनी योजनांची माहिती गावकऱ्यांना दिली. उद्या ही यात्रा जलधारा आणि नंदगाव तांडा इथं पोहोचणार आहे. थारा इथले प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी अशोक गाडेकर यांनी सांगितलं…

**होल्ड- बाईट- अशोक गाडेकर**

गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यात फुलबोडी आणि कारवाफा, अहेरी तालुक्यात वांगेपल्ली आणि चिंचगुडी, आरमोरी तालुक्यात वघाळा आणि सायगाव, तसंच गडचिरोली तालुक्यात हिरापूर आणि डोंगरगाव इथंही आज विकसित भारत संकल्प यात्रा पोहचली. तिथं नागरिकांनी यात्रेला उत्तम प्रतिसाद दिला.

**<><><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि पक्षचिन्हाच्या मुद्द्यावर केंद्रीय निवडणुक आयोगासमोर पुढची सुनावणी शुक्रवारी होणार आहे. नवी दिल्लीत आज झालेल्या

सुनावणीत अजित पवार यांच्या गटानं सादर केलेली ९ हजार बनावट प्रतिज्ञापत्र यावेळी शरद पवार गटाच्या वतीनं सादर झाली.  ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी आज युक्तीवाद केला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संस्थापकांमध्ये असलेल्या एका व्यक्तीचं बनावट प्रतिज्ञापत्र अजित पवार गटानं सादर केलं होतं. त्या व्यक्तीला सिंघवी यांनी आयोगासमोर उभं केलं.

**<><><><><><>**

पालघर जिल्ह्यात कुपोषण ही गंभीर समस्या आहे. येत्या पाच वर्षात जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनानं लक्षित हस्तक्षेप करावा, असं राज्यपाल रमेश बैस यांनी आज सांगितलं. ते आज पालघर जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त डहाणू इथं आयोजित महाशिबिराचं उद्घाटन करताना बोलत होते. विकसित भारत संकल्प यात्रा स्थानिक उत्पादनाच्या प्रचार आणि विक्रीवर जोर देते. कौशल्य विकास हा या परिवर्तनकारी यात्रेचा आणखीन एक पैलू आहे. जिथं प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही कौशल्य असलं पाहिजे, ज्यामुळे ते केवळ आत्मनिर्भरचं नव्हे तर आपल्या क्षेत्राच्या सामूहिक समृद्धीसाठी देखील योगदान देवू शकतील, अशा पालघरची आपण कल्पना करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

केंद्रीय पंचायतराज राज्य मंत्री कपील पाटील, पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, तसंच स्थानिक खासदार, आमदार यावेळी उपस्थित होते. भारत विकसित देश व्हावा, यासाठी गावं विकसित झाली पाहिजेत, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संकल्पना आहे, त्यासाठी ज्यांच्यापर्यंत विकासाचे लाभ पोचले नाहीत, त्यांच्यापर्यंत ते पोचले पाहिजेत, असं केंद्रीय पंचायतराज राज्य मंत्री कपील पाटील यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**होल्ड- बाईट - कपील पाटील**

या कार्यक्रमात केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांनी राज्यपाल बैस यांच्या समोर आपलं मनोगत व्यक्त केलं.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय हृदयंगम मराठी साहित्य संमेलन 2 आणि 3 डिसेंबर मॉरिशसला होणार आहेत. मॉरिशस सरकारचं कला आणि सांस्कृतिक वारसा मंत्रालयांतर्गत कार्यरत मराठी स्पीकिंग युनियन, तसेच मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशन आणि कोकण मराठी साहित्य परिषद या संमेलनाचं आयोजन करणार आहे. ज्येष्ठ संपादक, लेखक विजय कुवळेकर संमेलनाचे अध्यक्ष, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर हे उद्घाटक आणि मॉरिशसमधल्या निशी हिरु या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष आहेत. कोमसापचे केंद्रीय कार्याध्यक्ष डॉ प्रदीप ढवळ यांनी कणकवलीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

या दोन दिवसीय संमेलनाच्या पहिल्या दिवशी संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याबरोबरच ग्रंथदिंडी, ग्रंथ प्रकाशन आणि प्रदर्शन, आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक कार्यक्रम होईल. त्यानंतर "देशविदेशातील मराठी भाषेचे जतन या विषयावरील परिसंवाद आणि निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. तर संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी "वाचन : बदलता दृष्टिकोन आणि स्वरूप या विषयावरील परिसंवादाबरोबरच मान्यवराच्या मुलाखती तसेच कलाविष्कार व सांस्कृतिक कार्यक्रमांची सत्रे संपन्न होणार आहेत. तीन दशकांपूर्वी मॉरिशस येथे विश्व मराठी साहित्य संमेलन झाले होते.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ, तर विदर्भात काही ठिकाणी किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><><>//